**प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर,**
**पहिला माळा, "डी" विंग वनभवन, सिव्हील लाईन्स्, नागपूर-४४०००१.**
**दुरध्वनी क्र. (०७१२-२५५६९१६) ई-मेल** apccfnodel@mahaforest.gov.in

क्र. कक्ष-१७/FCA-S१/PID-१११९२/Chandrapur/ 353
नागपूर-४४०००१, दिनांक: 15/05/2024

प्रति,
प्रधान सचिव (वने),
महसूल व वनविभाग
मंत्रालय मुंबई-३२.

**विषय:** दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील ८०.७७ हे. वनजमीनीवरील खाणपट्ठा नुतनीकरणाचा प्रस्ताव

**संदर्भ:** १) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मंत्रालय यांचे पत्र क्र. एफएलडी-२०१९/प्र.क्र.३१०/ फ-१०, दि. ०१/०१/२०२१.

२) मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर यांचे पत्र क्र.कक्ष-३(१)/जमिना/प्र.क्र.४८/२०२४-२५/१३८, दि.०९/०५/२०२४.

विषयांकित प्रकरणी शासनाने संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये उपस्थित केलेल्या २ मुद्यांची पुर्तता करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर यांचे संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये पुर्तता अहवाल सादर केलेला आहे. शासन पत्रातील मुद्यांबाबतचा पुर्तता अहवाल खालीप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अनु.क्र. | मुद्दा | पुर्तता |
|---|---|---|
| १. | सदरचे खाणपट्ठा मुदतवाढीचे क्षेत्र ताडोबाचे अधिसूचित बफर क्षेत्रापासून १.२५ कि.मी. अंतरावर आहे. या प्रकल्पामुळे वाघ तसेच इतर वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गावर/अधिवासावर विपरीत परिणाम होतो किंवा कसे याची तपासणी होणे आवश्यक आहे. | मुख्य वनसंरक्षक चंद्रपुर यांचेकडील प्राप्त पूर्तता अहवालानुसार दुर्गापूर ओपन कास्ट ८०.७७ हे. वनजमिनीचा नुतनीकरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असतांना प्रकल्प बाधीत क्षेत्र वन्यप्राण्यांच्या भ्रमाणमार्गावर/अधिवासावर विपरीत परिणाम होतो किवा कसे याबाबत विचारणा केली असता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या पत्रानुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पापासून दक्षिणेकडील चपराळा अभयारण्या ते छत्तीसगड राज्यातील इंद्रावतीतील व्याघ्र प्रकल्पाला जोडणारा आहे. तेव्हा प्रकल्प यंत्रणेनी वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर यांनी |

| | | |
|---|---|---|
| | | दि.१४/०२/२०२४ च्या पत्रान्वये कळविले. त्यानुषंगाने मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर यानी प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर यांचेकडे सादर केलेला आहे. सदर पत्राची प्रत सहपत्रित करण्यात येत आहे. **पान क्र.** 9, 10 |
| २. | प्रस्तुत प्रकरणी ९३ वृक्षांची तोड होणे याबाबत स्पष्टीकरण करावे. | मुख्य वनसंरक्षक चंद्रपुर यांचेकडील प्राप्त पूर्तता अहवालानुसार दुर्गापूर ओपन कास्ट माईन ८०.७७ हे. क्षेत्राच्या Safety Zone मध्ये उभे असलेले ९३ वृक्षांची तोड होणार आहे. कारण ८०.७७ हे. आणि १२१.५८ हे. बाधीत क्षेत्र Cluster प्रस्ताव आहे. त्यामुळे प्रकल्प यंत्रणेस १२१.५८ हे. क्षेत्राच्या प्रस्तावातील क्षेत्रामध्ये प्रवेश करण्यासाठी ८०.७७ हे. क्षेत्रातील उभे असलेले Benches safety zone क्षेत्रामध्ये खाणकाम करावयाचे असल्याने ९३ वृक्षांची तोड करुन १२१.५८ हे. क्षेत्रामध्ये प्रवेश करावयाचे आहे.९३ वृक्षांचा तपशील सहपत्रित करण्यात येत आहे. पान क्र. 11, 12 |

मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर यांचेकडून उपरोक्त प्रमाणे सादर करण्यात आलेला पूर्तता अहवाल आवश्यक पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र: वरील प्रमाणे**

15/5/24

**(नरेश झुरमुरे)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**

**प्रतिलीपी:-** मुख्स वनसंरक्षक चंद्रपूर वनविभाग अमरावती यांना माहिती करीता सादर.
**प्रतिलीपी**:- विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग चंद्रपूर यांनी माहिती करीता सादर.
**प्रतिलीपी:-** क्षेत्रिय महाप्रबंधक, वं.को.लि., चंद्रपूर क्षेत्र बाबुपेठ चंद्रपूर यांना माहिती करीता सादर

महाराष्ट्र शासन वन विभाग
मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत्त चंद्रपुर, यांचे कार्यालय
वनभवन,सिव्हील लाईन, नागपुर रोड, चंद्रपूर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्र.07172-256279, 252232 E-mail :- ccfchandrapur@gmail.com, ccfchandrapur@mahaforest.gov.in

क्रमांक : कक्ष-3(1)/जमिन/प्र.क्र.48/2024-25/ 138 दिनांक :- 09-05-24

प्रति,

**मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य नागपूर**

विषय :- दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील 80.77 हे. वनजमीनी वरील खाणपटटा नुतनीकरणाचा प्रस्ताव

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. एफएलडी-2019/प्र.क्र.310/फ-10, दिनांक 01.01.2021
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर यांचे कार्या पत्र क्र. कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.292/5236, दिनांक 20.01.2021
3. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर यांचे कार्या पत्र क्र. कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.292/5236, दिनांक 14.02.2024
4. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-14/सर्व्हे/जमीन/2358, दिनांक 27.03.2024
5. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-3(1)/जमीन/प्र.क्र.48/2024-25/29, दिनांक 10.04.2024
6. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-14/सर्व्हे/जमीन/185, दिनांक 07.05.2024

महाराष्ट्र शासनाचे संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये दुर्गापूर ओपन कास्ट माईन 80.77 हे. नुतनीकरण प्रस्तावाच्या अनुषंगाने 2 मुदयांची माहिती बाबत विचारणा करण्यात आलेली होती. त्यानुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर यांचे कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये दुर्गापूर ओपन कास्ट प्रकल्पाचे 80.77 हे. क्षेत्र व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यामुळे प्रकल्प यंत्रणेनी वन्यजीव मान्यतेचा प्रस्ताव देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने प्रकल्प यंत्रणेनी वन्यजीव मान्यतेचा प्रस्ताव विभागीच वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचेकडे सादर केला असता त्यांनी प्रस्तावाची तपासणी करून Part-III, Site Inspection Report व इतर माहिती भरून हार्ड कॉपीसह संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये या कार्यालयास सादर केलेली आहे.

वन्यजीव मान्यतेच्या प्रस्तावामध्ये निम्न हस्ताक्षरकर्ते यांनी Part-IV मध्ये अभिप्राय दिलेला असून प्रस्तावाच्या 4 प्रती अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांना सादर करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे वरिल संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये विचारणा केलेल्या 2 मुदयांची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुददा | खुलासा |
|---|---|---|
| 1. | सदरचे खाणपटटा मुदतवाढीचे क्षेत्र ताडोबाचे अधिसुचित बफर क्षेत्रापासून 1.25 कि.मी. अंतरावर आहे. या प्रकल्पामुळे वाघ तसेच इतर वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गावर/ अधिवासावर विपरीत परिणाम होतो किंवा कसे, याची तपासणी होणे आवश्यक आहे. | दुर्गापूर ओपन कास्ट 80.77 हे. वनजमिनीचा नुतनीकरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असतांना प्रकल्प बाधीत क्षेत्र वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गावर/ अधिवासावर विपरीत परिणाम होतो किंवा कसे याबाबत विचारणा केली असता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर यांचे संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये सदर क्षेत्र |

401
13/5/24

| | | |
|---|---|---|
| | | ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पापासून दक्षिणेकडील चपराळा अभयारण्य ते छत्तीसगड राज्यातील इंद्रावतीतील व्याघ्र प्रकल्पाला जोडणारा आहे. तेव्हा प्रकल्प यंत्रणेनी वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करणे क्रमप्राप्त आहे.<br>त्यानुषंगाने प्रकल्प यंत्रणेनी वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर केला असता या कार्यालयाचे पत्र क्र. 29, दि. 10.04.2024 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांना प्रस्ताव सादर केलेला आहे. |
| 2. | प्रस्तुत प्रकरणी 93 वृक्षांची तोड होते, याबाबत स्पष्टीकरण करावे. | दुर्गापूर ओपन कास्ट माईन 80.77 हे. क्षेत्राच्या Safty Zone मध्ये उभे असलेले 93 वृक्षांची तोड होणार आहे.<br>कारण 80.77 हे. आणि 121.58 हे. बाधीत क्षेत्र Cluster प्रस्ताव आहे.<br>त्यामुळे प्रकल्प यंत्रणेस 121.58 हे. क्षेत्राच्या प्रस्तावातील क्षेत्रामध्ये प्रवेश करण्यासाठी 80.77 हे. क्षेत्रातील उभे असलेले Benches व ~~Safty~~ Safety Zone क्षेत्रामध्ये खाणकाम करावयाचे असल्याने 93 वृक्षांची तोड करून 121.58 हे. क्षेत्रामध्ये प्रवेश करावयाचा आहे. |

करीता माहितीस सविनय सादर.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे

(डॉ. जितेंद्र रामगावकर)
**मुख्य वनसंरक्षक**
**चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर**

**प्रतिलिपी-** विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
**प्रतिलिपी-** क्षेत्रिय महाप्रबंधक, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र, बाबुपेठ, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

महाराष्ट्र शासन
वनविभाग

# विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालय

रामबाग फॉरेस्ट कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर - 442401 (म.रा.)
E-mail :- dfochandrapur@gmail.com

क्रमांक :- कक्ष-14/सर्व्हे/जमीन/ 185 दिनांक :- 7.5.2024

प्रति,

मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त,
चंद्रपूर.

**विषय :-** दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्ह्यातील 80.77 हे. वनजमीनीवरील खाणपट्टा नुतनीकरणाचा प्रस्ताव.

**संदर्भ :-**
1. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक एफएलडी-2019/प्र.क्र.310/फ-10, दिनांक 01/01/2021.
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र/2546/2020-21, दिनांक 20/01/2021.
3. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-3(1)/जमीन/प्र.क्र.48/2020-21/3199, दिनांक 01/02/2021.
4. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-14/सर्व्हे/जमीन/1619, दिनांक 11/02/2021.
5. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-3(1)/जमीन/प्र.क्र.481/2019-20/4079, दिनांक 25/03/2021.
6. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-14/सर्व्हे/जमीन/05, दिनांक 05/04/2021.
7. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.292/5236/2023-24, दिनांक 14/02/2024.
8. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-14/सर्व्हे/जमीन/35, दिनांक 04/04/2024.
9. क्षेत्रीय महाप्रबंधक, चंद्रपूर क्षेत्र यांचे पत्र क्रमांक वेकोलि/चक्षे/क्षेमहाप्र/योजना/राजस्व/952, दिनांक 06/05/2024.

07/05/2024
आवक लिपीक
मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर वनवृत्त
यांचे कार्यालय

महाराष्ट्र शासनाचे संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये विषयांकीत प्रकरणी खालील 2 मुद्याबाबत माहिती मागविण्यांत आलेली आहे. या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक 6 अन्वये पूर्तता अहवाल मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांना सादर करण्यांत आलेला आहे. त्याअनुषंगाने यंत्रणेने त्यांचे संदर्भिय पत्र क्रमांक 9 अन्वये सुधारीत अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे पूर्तता अहवालासह 4 प्रतीत यासोबत जोडून सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| 1. | सदरचे खाणपट्टा मुदतवाढीचे क्षेत्र ताडोबाचे अधिसूचित बफर क्षेत्रापासून 1.25 कि.मी. अंतरावर आहे. या प्रकल्पामुळे वाघ तसेच इतर वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गावर / अधिवासावर विपरित परिणाम होता किंवा कसे, याची तपासणी होणे आवश्यक आहे. | ताडोबा-कन्हाळगांव-टिपेश्वर-कावल या अभयारण्याच्या भ्रमणमार्गामध्ये चंद्रपूर वनविभागातील वनखंड क्रमांक 400 व 401 चा समावेश आहे. सदर वनखंडातील 80.77 हे. वनक्षेत्र विषयांकीत खदानीकरीता उपयोगात आलेले आहे. यंत्रणेने सदर क्षेत्रातील शिल्लक कोळसा काढण्याकरीता नुतनीकरणाचा |

| | | |
|---|---|---|
| | | प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक 8 अन्वये Wildlife Clearance Proposal मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांना सादर करण्यांत आलेला आहे. |
| 2. | प्रस्तुत प्रकरणी 93 वृक्षांची तोड होते, याबाबत स्पष्टीकरण करावे. | तोड होणारे 93 वृक्ष सदर खदानीच्या Safety Zone क्षेत्रातील आहे. Safety Zone क्षेत्राला लागून 121.58 हे. दुर्गापूर डिप एक्सटेंशन ओपन कास्ट प्रोजेक्टमध्ये वळती होणारे वनक्षेत्र लागलेले आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाचे पत्र क्रमांक 8-84-2014-FC, दिनांक 22/12/2021 अन्वये अंतिम मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदर प्रस्तावास केंद्र शासनाचे पत्र क्रमांक 6-1/2023 WL, दिनांक 19/05/2023 अन्वये राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचीसुध्दा मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर खदानीची सुरूवात 80.77 हे. मधील बेंचेसच्या आधारे करण्यांत येणार असल्याने Safety Zone क्षेत्रातील 93 झाडे तोड करणे प्रस्तावित आहे. |

**सहपत्र :-** पूर्तता अहवाल 4 प्रतीत.

शुभांगी
07/05/24
**(शुभांगी चव्हाण)**
**विभागीय वन अधिकारी (अति.),**
**चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर**

**प्रतिलिपी :-** क्षेत्रीय महाप्रबंधक, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र, पो. बाबुपेठ, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

केवल नागपुर कोर्ट के अधिकारक्षेत्र मे

Under Jurisdiction of Nagpur Court only

**वेस्टर्नकोलफील्ड्सलिमिटेड/Western Coalfields Limited**

मिनिरत्न कम्पनी(A Miniratna Company)

कोल इंडिया लिमिटेड की अनुषंगी कम्पनी(A Subsidiary of Coal India Limited)

**CIN-U10100MH1975GOI018626**

**क्षेत्रीय महाप्रबन्धक का कार्यालय, चन्द्रपुर क्षेत्र**

पता: वे.को.लि., चन्द्रपुर क्षेत्र, पो:बाबुपेठ,

जिला: चन्द्रपुर, महाराष्ट्र, पिन : 442403

**Office of Area General Manager, Chandrapur Area**

**Address: WCL, Chandrapur Area, PO: Babupeth,**

**Dist: Chandrapur, MS, PIN : 442403**

**Email: agmchandrapur.wcl@coalindia.in**

**Fax:07172-255287, Phone: 07172-253322-25**

संदर्भ : वेकोलि/चक्षे/क्षेमहाप्र/योजना/राजस्व/ 952

दिनांक: 06/05/2024

प्रति

विभागीय वन अधिकारी
चंद्रपुर वन विभाग
चंद्रपूर

Sub: Renewal of 80.77 Ha Forest Land for opencast mining of Durgapur Opencast Project, M/s. Western Coalfields Limited, Chandrapur Area

Ref:
1. Under Secretary, Revenue & Forest Department, Mantralaya, Mumbai, Maharashtra State letter no. FLD-2019/Pr.Kr.310/F-10 dated 01.01.2021
2. DFO, Chandrapur reply vide Desk-14/Survey/Land/1619 dated 11.02.2021
3. Reply by WCL, Chandrapur Area vide letter no. WCL/CHA/AGM/PLG/REV/6844 dated 02.03.2021
4. DFO, Chandrapur reply vide Desk-14/Survey/Land/05 dated 05.04.2021
5. PCCF (WL), Maharashtra State letter no. Desk-23(2)/WL/Survey/Pr.Kr.292/5236/2023-24 dated 14.02.2024

Dear Sir,

With reference to the above subject, WCL had submitted an application for renewal of forest clearance of 80.77 Ha Forest land of Durgapur Opencast Project. This application had been forwarded to the Secretary (Forests), Revenue & Forest Department, Maharashtra State. In response the Under Secretary, Revenue & Forest Department, Mantralaya, Mumbai, Maharashtra State had raised 2 point queries on Wildlife Corridor and felling of 93 trees. These queries and Replies of User Agency are as below:

| Sr. No. | Query | Reply from User Agency |
|---|---|---|
| 1 | As the mine lease extension area is 1.25 km from Tadoba Buffer Zone, whether it will make any adverse effect on movement/ | The proposed 80.77 Ha Forest Land is falling in the Tiger Corridor area of Tadoba Andhari Tiger Reserve. However, the proposed 80.77 Ha is |

| | | |
|---|---|---|
| | habitat of wildlife using this corridor | falling on adjacent inner side of 121.58 Ha Forest Land. 121.58 Ha Forest Land has already been granted Stage II Forest Clearance vide MoEF & CC letter F.No. 8-84-2014-FC dated 22.12.2021 and Wildlife Clearance vide MoEF & CC letter F.No.6-1/2023 WL dated 19.05.2023 respectively.<br><br>The Principal Chief Conservator of Forests, Maharashtra State has directed to obtain recommendation of National Board vide letter no.5 above. Copy of the letter is enclosed herewith. As directed by the PCCF (WL), an application for wildlife clearance was already submitted in Parivesh 2.0 Portal vide proposal no. 463196 on 27.02.2024. DFO, Chandrapur have forwarded the proposal online with Part III along with Site Inspection Report vide letter 04.04.2024. CCF, Chandrapur Circle also forwarded the same vide letter dated 10.04.2024 respectively.<br><br>It is pertinent to mention that Wildlife Mitigation Measures worth Rs.18.07 Crore has been already approved by the PCCF (WL) vide letter no. Desk-23(2)/WL/Survey/Pr.Kr.53/ 1061/2022-23 dated 12.07.2022 for the 121.58 Ha Forest land which is located adjacent to the proposed 80.77 Ha Forest Land of the same project. The wildlife mitigation covered entire Durgapur OC Project. This wildlife mitigative measure helps to maintain continuous use of wildlife corridor by the wild animals. |
| 2 | Clarification regarding felling of 93 trees is desired | Due to the cluster of 80.77 Ha & 121.58 Ha forest land areas, the Safety Zone area 2.63 ha which is allotted earlier for 80.77 Ha forest land in 2005 will now be utilized for mining purpose. Further, 3.18 Ha safety zone area is allotted at the northern boundary of 121.58 Ha as |

| | | |
|---|---|---|
| | | per FCA guidelines.<br>The number of trees has been counted again in March 2024. Updated report 93 trees to be felled is enclosed herewith.<br>However, as per the FC Act 1980, cost for the felling of trees will be deposited during Stage I Compliance. |

Submitted for forwarding this to Chief Conservator of Forests, Chandrapur Circle for onward transmission to APCCF (Nodal Officer), Maharashtra State for early renewal of forest clearance of 80.77 Ha Forest Land.

Thanking you,

Yours faithfully

क्षेत्रीय महाप्रबंधक,
चंद्रपूर क्षेत्र

Encl: -- 4 Sets

1. Copy of Reference letters 1 to 5
2. Stage II FC & Wildlife Clearance Letter of 121.58 Ha Forest Land
3. Approval of Wildlife Mitigation Measures by PCCF (WL), MS
4. Updated List of Trees to be felled from RFO, Chandrapur Range & DFO, Chandrapur Division

**Copy to:**

1. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, वन भवन, महाराष्ट्र रेज्य, नागपूर - 440001
2. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत, चंद्रपूर
3. महाप्रबंधक (भू/रा), वेकोली मुख्यालय, नागपूर
4. महाप्रबंधक (पर्यावरण / वन), वेकोली मुख्यालय, नागपूर
5. उपक्षेत्रीय प्रबंधक, दुर्गापुर उप क्षेत्र

# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-२०१९/प्र.क्र.३१०/फ-१०
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०१.०१.२०२१

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय:** दूर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्ह्यातील ८०.७७ हे. वनजमिनीवरील खाणपट्टा नुतनीकरणाचा प्रस्ताव.

**संदर्भ:** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. Desk-१७/NC/I/ID-८९६/१९-२०, दि.२३.०८.२०१९

महोदय,

विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील मुद्यांबाबत माहिती / अभिप्राय / स्पष्टीकरणात्मक खुलासा आपणाकडून प्राप्त करून घेण्याचे मला निर्देश आहेत:-

- सदरचे खाणपट्टा मुदतवाढीचे क्षेत्र ताडोबाचे अधिसूचित बफर क्षेत्रापासून १.२५ कि.मी. अंतरावर आहे. या प्रकल्पामुळे वाघ तसेच इतर वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गावर / अधिवासावर विपरित परिणाम होतो किंवा कसे याची तपासणी होणे आवश्यक आहे.
- प्रस्तुत प्रकरणी ९३ वृक्षांची तोड होते याबाबत स्पष्टीकरण करावे.

तरी, उपरोक्त मुद्यांबाबतची माहिती शासनास सादर करावी , ही विनंती.

(सुनिल पांढरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य
Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
"Van Bhavan"3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001
Phone - 0712-2549563
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website - www.mahaforest.gov.in

पत्र-ईमेल क्रमांक:-कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.२९२/५२३६/२०२३-२४. दिनांक:- १४/०२/२०२४

प्रति,

अपर प्रधन मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
पुर्व नागपूर.

विषय:- दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील ८०.७७ हे. वनजमीनी वरील खाणपट्टा नुतनीकरणाचा प्रस्ताव.

संदर्भ:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व नागपूर यांनी या कार्यालयास उद्देशुन लिहलेले त्यांचे कडील पत्र क्र. १०३९ दि. १६/०१/२०२४

दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील ८०.७७ हे. वनजमीनी वरील खाणपट्टा नुतनीकरणाचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला. सदर प्रस्तावाचे तांत्रिक संस्करण केले असता खालील बाबी निदर्शनास येत आहे.

१. चंद्रपूर वनविभागातील वनखंड क्रमांक ४००, ४०१ , ४०२ व २६२/१ मधील १२१.५८ हेक्टर वनक्षेत्राला राष्टीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची ७२ वी बैठक दिनांक २४/०४/२०२४ रोजी मान्यता प्रदान केलेली होती.
२. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. ४९७ दिनांक २२/०५/२०२३ अन्वये कामे सुरु करण्याची मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.
३. प्रस्तावित ८०.७७ हे. वनजमीनीवरील खान पट्टा हा वर नमुद केलेल्या १२१.५८ हेक्टर पैकी नाही.
४. प्रस्तावित खान पट्टा नुतनिकरणाचे क्षेत्र (८०.७७ हे. ) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पापासून दक्षिणेकडील चपराळा अभयारण्य ते छत्तीसगड राज्यातील इंद्रावतील व्याघ्र प्रकल्पाला जोडणारा व्याघ्र भ्रमणमार्गावरील क्षेत्र आहे.
५. प्रस्तावित कोळसा खाणीमुळे वन्यजीवांच्या अधिवासास तसेच भ्रमणमार्गास बाधा निर्माण होईल.

६. प्रस्तावित ८०.७७ हे. दुर्गापूर ओपनकास्ट माईनचे प्रस्तावास मंजूरी देणेबाबत प्रस्तव राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समिती समोर तसेच, राट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहेत.

७. सदर प्रस्तावास मंजूरी देणे क्रमप्राप्त झाल्यास दुर्गापूर येथिल प्रस्तावित कोळसा खाणीकरीता मागणी करण्यात येत असलेल्या वनक्षेत्रात ओपनकास्ट ऐवजी भुमिगत कोळसा खाण प्रस्तावित केल्यास वन तसेच वन्यजीव यांच्या अस्तित्वाला बाधा निर्माण होणार नाही. व वन्यप्राण्याचे भ्रमणमार्ग सुध्दा अबाधित राहील.

८. दुर्गापूर ओपनकास्ट माईनसाठी प्रस्तावित असलेले क्षेत्राला लागून प्रस्तावीत व्याघ्र सफारीचे क्षेत्र आहे.

९. याद्दष्टीने प्रस्तावित माईनचे क्षेत्र तसेच व्याघ्र सफारीचे क्षेत्र यादरम्यान ३ मीटर उंची असलेली ७००० मीटर लांब संरक्षण भिंत किंवा इतर आवश्यक Barrior वन्यजीव विभागाचे असल्याने संबधित खाण व्यवस्थापनाकडून बांधून देण्यात यावी. अशी शिफारस क्षेत्रीय स्तरावरुन करण्यात आलेली आहे.

वरिल सर्व घटनाक्रम लक्षात घेता दुर्गापूर ओपनकास्ट माईनसाठी प्रस्तावित खान पट्टा नुतनिकरणाचे क्षेत्र (८०.७७ हे. ) हे व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यामुळे प्रकल्प यंत्रणेने वन्यजीव मान्यतेचा प्रस्ताव सादर करुन त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे, असे ईकडील मत आहे.

(महिप गुप्ता)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य

प्रतिलीपी - प्रधान सचिव (वने), महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस सादर.
प्रतिलीपी - अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंन्द्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य यांना माहितीस अग्रेषीत.
प्रतिलीपी - वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा व्याघ्र प्रकल्प, चंद्रपुर याना माहितीस अग्रेषीत .
प्रतिलीपी - मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत्त, चंद्रपुर यांना माहितीस अग्रेषीत.
प्रतिलीपी - विभागीय वन अधिकारी, चंद्रपुर वनविभाग चंद्रपुर यांना माहितीस अग्रेषीत.

## Tree and Bamboo Clump List

| Sr. No. | Species Name | Girth in CM |
|---|---|---|
| 1 | Moha | 252 |
| 2 | Surya | 145 |
| 3 | Moha | 262 |
| 4 | Bahava | 62 |
| 5 | Bahava | 63 |
| 6 | Sina | 39 |
| 7 | Surya | 39 |
| 8 | Surya | 35 |
| 9 | kadunim | 57 |
| 10 | kadunim | 48 |
| 11 | Maharukh | 57 |
| 12 | Sina | 30 |
| 13 | Sina | 39 |
| 14 | Sina | 80 |
| 15 | yen | 115 |
| 16 | Ekhternbur | 102 |
| 17 | Behda | 77 |
| 18 | Chichva | 76 |
| 19 | Dhoban | 80 |
| 20 | Dhoban | 80 |
| 21 | Movai | 97 |
| 22 | Dhavada | 47 |
| 23 | Movai | 85 |
| 24 | Movai | 30 |
| 25 | Dhoban | 51 |
| 26 | khair | 50 |
| 27 | Chichva | 62 |
| 28 | Dhoban | 80 |
| 29 | yen | 40 |
| 30 | Bahava | 47 |
| 31 | Surya | 50 |
| 32 | Surya | 40 |
| 33 | Kateyen | 73 |
| 34 | Behda | 68 |
| 35 | Sina | 43 |
| 36 | Sina | 66 |
| 37 | Moha | 80 |
| 38 | Dhavda | 75 |
| 39 | Bhera | 50 |
| 40 | Surya | 60 |
| 41 | Bahava | 42 |
| 42 | Surya | 40 |
| 43 | Movai | 70 |
| 44 | Surya | 40 |
| 45 | Dhavda | 45 |

Bamboo clump

| Sr. No. | Species Name | Nos |
|---|---|---|
| 1 | Bamboo clump | 48 |

28/3/2024

RANGE FOREST OFFICER

(Prashant Khade)

Divisional Forest Officer

Chandrapur Division Chandrapur

Divisional Forest Officer ★ Chandrapur Division, Chandrapur ★

## Abstract

| Sr.No. | Tree Name | Girth Class | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | U/30 | 31-45 | 46-60 | 61-75 | 76-90 | 91-105 | 106-120 | 121-135 | 136-150 | Above 150 | Total |
| 1 | Moha | | | | | 1 | | | | | 2 | 3 |
| 2 | Surya | | 5 | 2 | | | | | | 1 | | 8 |
| 3 | Bahava | | 1 | 1 | 2 | | | | | | | 4 |
| 4 | Sina | 1 | 3 | | 1 | 1 | | | | | | 6 |
| 5 | Kadunim | | | 2 | | | | | | | | 2 |
| 6 | Maharukh | | | 1 | | | | | | | | 1 |
| 7 | Yen | | 1 | | | | | | | | | 1 |
| 8 | Ekhtembur | | | | | | 1 | | | | | 1 |
| 9 | Behada | | | | 1 | 1 | | | | | | 2 |
| 10 | Chichva | | | | 1 | 1 | | | | | | 2 |
| 11 | Dhoban | 1 | | 1 | | 3 | | | | | | 5 |
| 12 | Movai | 1 | | | 1 | 1 | 1 | | | | | 4 |
| 13 | Dhavda | | 1 | 1 | 1 | | | | | | | 3 |
| 14 | Khair | | | 1 | | | | | | | | 1 |
| 15 | Kateyen | | | | 1 | | | | | | | 1 |
| 16 | Bhera | | | 1 | | | | | | | | 1 |
| | Total | 3 | 11 | 10 | 8 | 8 | 2 | 0 | 0 | 1 | 2 | 45 |
| 17 | Bamboo Ranji | | | | | | | | | | | 48 |
| | Total | 3 | 11 | 10 | 8 | 8 | 2 | 0 | 0 | 1 | 2 | 93 |

28/3/2024

RANGE FOREST OFFICER
Chandrapur Range, Chandrapur

(Prashant Khade)
Divisional Forest Officer
Chandrapur Division Chandrapur

Divisional Forest Officer ★ Chandrapur Division, Chandrapur ★